वर्ष ४३ अंक ४

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ || मराठी तितुका मेळवावा ||

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

On the web www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

एप्रिल २०२३


## अध्यक्षीय



नमस्कार प्रिय मित्र मैत्रिणींनो,

सर्वांना शके १९४५ आणि नव संवत्सर २०८० वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! हे वर्ष सर्वांना सुख, समृद्धी आणि आरोग्यदायी लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

मी गेल्या वृत्तामधे लिहिले होते, की दोन मिलियन डॉलर्सचा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा ( बृ. म. मंडळ/ बीएमएम ) शैक्षणिक देणगी-निधी (Educational Endowment Fund) २०२४ जून पर्यंत उभा करण्याचे आमचे स्वप्न आहे. या प्रकल्पाचे मुख्य कारण म्हणजे उत्तर अमेरिकेतील आपल्या भावी पिढीच्या यशस्वी होण्यात आपला खारीचा वाटा. या कामाची सुरुवात आपण यावर्षीपासून बीएमएम युवा इंटर्नशिपने करत आहोत. यात १४ ते १८ वयोगटातील १५० विद्यार्थ्यांनी भाग घेतलेला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आपण जुलै-ऑगस्ट या महिन्यांमध्ये साधारणपणे आठवड्याला तीन ते चार तास काम देणार आहोत - दोन महिन्यांमध्ये साधारणपणे ३० तास. यात सहभागी विद्यार्थ्यांपैकी ७० - इंजिनिअरिंग, ४० - मेडिकल, २० - बिजनेस, १०- अकौंटिंग आणि १० विद्यार्थ्यांनी ड्रामा/ आर्ट्स अशी आवड दाखवलेली आहे. प्रत्येकाला त्यांच्या आवडीच्या क्षेत्राची अधिक माहिती व्हावी, गोडी निर्माण व्हावी, हा या इंटर्नशिप मागचा हेतू आहे. इंटर्नशिप पूर्ण केल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याला बीएमएम कडून एक सर्टिफिकेट मिळेल जेणेकरून त्यांना त्यांच्या कॉलेजमध्ये प्रवेशाच्या वेळी $१००/BMM Credit Hours (१० तास काम = 1Credit hour) बीएमएम कडून देण्यात येतील. या पैशांची तरतूद मात्र आत्ता करून ठेवण्याची जबाबदारी माझ्या समितीची आहे. (प्रकल्प आमचा, कमिटमेंट/ जबाबदारी आमची) याकरता आम्ही बँकेमध्ये एक वेगळे खाते उघडले आहे आणि त्यामध्ये पैसे जमा करण्याची सुरुवातदेखील झाली आहे. यावर्षीची आपली भावी कमिटमेंट एकूण $४५,००० आहे. मी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व मान्यवरांना नम्र विनंती करतो, की तुम्ही दहा विद्यार्थ्यांसाठी $३,००० डॉलर्स किंवा पाच विद्यार्थ्यांसाठी $१,५०० डॉलर्स किंवा कमीत कमी एका विद्यार्थ्यांसाठी $३०० ची देणगी द्यावी. १५० विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी $३०० ची भावी कमिटमेंट आहे. देणगीदारांची यादी आम्ही यापुढील प्रत्येक वृत्तात जाहीर करणार आहोत.

विद्यार्थ्यांना आपण ही फक्त आर्थिक मदत करत नसून, आपला मूळ उद्देश आपली भावी पिढी बृ. म. मंडळाशी संलग्न रहावी, एकनिष्ठ राहावी, असा आहे. मला खात्री आहे, की या प्रकल्पातून प्रेरणा घेऊन आपल्या उत्तर अमेरिकेतील मराठी समाजातील दुसऱ्या/तिसऱ्या पिढीतील मुले काही वर्षातच बृ.म. मंडळाच्या कार्यात भाग घेऊ लागतील. Immigrant-centric to resident-centric to North American-born and brought up-centric असा आपल्या मराठी समाजाचा प्रवास झाला पाहिजे. तरच आपल्या मराठी समाजाची वैचारिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समृध्दी टिकवून ठेवण्यात बीएमएमचा हातभार लागला असे मी मानेन. नेहमीप्रमाणे एका श्लोकाने थांबतो:

हेतुमदनित्यमव्यापि सक्रियमनेकमाश्रितं लिङ्गम् ।
सावयवं परतन्त्रं व्यक्तं विपरीतमव्यक्तम् ।।
(संदर्भ-सांख्यकारिका)

Meaning: The manifest is producible, non-eternal, non-pervasive, mobile, multi form, dependent, serving as a mark, a combination of parts and subordinate. The Un-manifest is the reverse of this all.

शुभेच्छा,




**- संदीप दीक्षित**
अध्यक्ष, २०२२-२४, बृ.म. मंडळ,उत्तर अमेरिका
+1 216-926-6696
sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/sandeepsdixit
www.bmmonline.org
https://bmm2.page.link/bmmapp
#bmm2 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber


***

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** -विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय


**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:-**


vinata.kulkarni@bmmonline.org Or vinata@gmail.com
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**
**BMM Treasurer -** Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330 Email- Rajan.Pednekar@bmmonline.org


**वर्गणीचे दर:- Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription

**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**
**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२-२०२४)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:-** | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| **सचिव:-** | अजित नातू | सॅक्रॅमेण्टो, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:-** | राजन पेडणेकर | टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| **सदस्य:-** | अमर उन्हेकर | लिव्हिंग्स्टन, न्यू जर्सी |
| | सविता मोरे | सिॲटल, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक | वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर | ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत | सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**
**माजी अध्यक्ष:-** विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय
**वृत्त संपादक:-** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**
**अध्यक्ष :-** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
**सदस्य :-** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
**सदस्य :-** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट
...



**प्रकाशक:-** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:-** https://www.bmmonline.org
**इमेल:** vrutta@bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


# या अंकात


| | पान क्र. |
|---|---|
| - अध्यक्षीय | १ |
| - बृ.म. मंडळ अधिवेशन, बे एरिया- २०२४- वार्ता | ३ |
| - लेख:- 'रहे ना रहे हम' | ४ |
| - 'रिश्ते कभी पुराने नहीं होते' | ६ |
| - अष्टपैलू कलाकार: मेधा अत्रे-कुलकर्णी | ८ |
| - पुस्तक-परिचय:-'Featured Creatures: Animals in Our Lives' | |
| - चित्र-कल्पना:- वेळेची झाली भूल आणि... | ९ |
| - पुरवणी ऑनलाईन:- अनुक्रम- कविता, साहित्यकुंज | |
| - 'शब्दफोड'- मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा खेळ | १० |
| - Supriya Kelkar honored by Michigan's Congress | |
| - Business Advertisement | ११ |
| - बृ.म. मंडळाचे काही प्रकल्प पृष्ठ २ आणि ......... | १२ |


# बृहन्महाराष्ट्र मंडळाचा प्रकल्प

**YouTube मालिका - भाग ४**
**"उगवली स्वातंत्र्याची पहाट "**
**श्री. प्रभाकर घाटे**
अमेरिकेत स्थलांतर १९५८



तो स्वातंत्र्यापूर्वीचा काळच अद्भुत होता, ती स्वातंत्र्यापूर्वीची लोकच वेगळी होती. अवतीभवती अनेक थोर, कर्तृत्ववान, ध्येयवादी लोकोत्तर नेते, समाजसुधारक भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी, समाजाला जागरूक करण्यासाठी धडपडत होते. मग साहजिकच त्या सर्वांचा त्यावेळच्या तरुण मनावर सुंदर संस्कार होणारच. स्वातंत्र्यापूर्वी जन्मलेल्या अशाच एका व्यक्तीची ओळख आम्ही करून देणार आहोत. स्वातंत्र्याच्या उगवत्या सूर्याच्या दर्शनाआधी काय वातावरण होते हे ज्यांनी बघितले, उपभोगले, प्रत्यक्ष स्वतंत्रतादिनाचा, म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ चा अनुभव ज्यांनी घेतला, अशाच एका व्यक्तीची मुलाखत पहा ह्या चौथ्या पुष्पात!

वारसा मालिकेचा हा भाग पहाण्यासाठी खालील (link) क्लिक करा किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. खालील यू ट्युब चॅनेलला like आणि subscribe करा.

**Episode 4 " उगवली स्वातंत्र्याची पहाट"**
**Past Episodes:-**
**https://www.youtube.com/@bmm-varasa**

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४ - विषयक वार्ता

- **अनिता कांत** (बे एरिया, कॅलिफोर्निया)





## महापौरांशी थेट भेट:

बृहन्महाराष्ट्र **मंडळाच्या २०२४ सालच्या** अधिवेशनाचे संयोजक श्री. प्रकाश भालेराव आणि कार्यकारिणी समितीचे सदस्य श्री सुनील गानू यांनी सॅन होजे शहराचे महापौर **श्री मॅट मेहान** यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना अधिवेशनाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. श्री मेहान यांनी सर्वतोपरी साहाय्य करण्याचे आश्वासन दिले आणि अधिवेशनासाठी शुभेच्छा दिल्या.




## नोंदणी चमूची बैठक:

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालातील अधिवेशनाच्या नोंदणी चमूत विविध क्षेत्रांतील चाळीसहून अधिक अनुभवसंपन्न कार्यकर्ते आहेत. त्यापैकी वीस कार्यकर्त्यांनी १९९९ सालच्या अधिवेशनातील नोंदणीच्या कामाची धुरा समर्थपणे पेलली होती. त्यांचा हा अनुभव अतिशय मोलाचा ठरेल. १९९९ सालच्या अधिवेशनात "On -Line" नोंदणीची कल्पना पहिल्यादा राबवण्यात आली होती. त्या अनुभवाला सध्याच्या प्रगत तंत्रज्ञानाची जोड देऊन २०२४ सालच्या अधिवेशनाची नोंदणी अधिक सुकर करण्यात येईल, असा विश्वास चमूचे संचालक श्री शरद गवळी यांनी प्रगट केला.

हा नोंदणी चमू गेले सहा महिने "Zoom"च्या माध्यमातून सक्रिय आहे. ह्या चमूची नुकतीच प्रत्यक्ष भेट झाली. त्यात आतापर्यंतच्या सर्व कामांमधील प्रगतीचा आढावा घेतला गेला. नोंदणी प्रक्रियेचे धोरण आणि कार्यपद्धती यासंबंधातील मार्गदर्शक योजनापत्रक तयार असून त्यानुसार पुढची पाऊले उचलली जातील. ही संपूर्ण प्रक्रिया कार्यकर्त्यांसाठी शैक्षणिक तसेच आनंदाचा उत्तम अनुभव ठरेल, अशी शरददादांना खात्री आहे. अधिवेशनात सहभागी होणाऱ्या सर्वांसाठीच हा सुखद अनुभव राहील, यासाठी BMM २०२४चा नोंदणी चमू कटिबद्ध आहे.



***

# 'रहे ना रहे हम!'

- **रवी गोडबोले** (ॲटलांटा, जॉर्जिया)
(ravigod08@rediffmail.com)

तसं पाहिलं तर रोजच कुठे ना कुठे मृत्यू होत असतात. वृत्तपत्रात वा सोशल मीडियावर वाचून आपण थोडा वेळ हळहळतो, इतकंच. मात्र गेलेली व्यक्ती नेहेमीच्या संपर्कातली किंवा अगदी जवळची असेल तर ते दुःख प्रकर्षानं व दीर्घ काळ जाणवतं. गेल्या वर्षभरात ॲटलांटात झालेल्या तीन मृत्यूंमुळे वैयक्तिक हानी झाल्याची जाणीव झाली. त्यांचे मला भावलेले गुणविशेष व आठवणी याद्वारे त्यांना श्रद्धांजली देण्याचा हा प्रयत्न.



रविवार २६ फेब्रुवारीला मित्राचा मेसेज आला, "अरे, आपले **राजन वेदक** गेले". माझा विश्वासच बसेना, कारण आदल्याच दिवशीच त्यांची भेट झाली होती व त्याच संध्याकाळी ते प्रवासाला निघणार होते. प्रवासातच त्यांचे अचानक निधन झाले. मला आठवतं, महाराष्ट्र मंडळात त्यांची व शीलाताईंची २००८मध्ये ओळख झाली. पुढे एकमेकांच्या घरी किंवा कुठल्या कार्यक्रमात अधुनमधुन भेट व्हायची. १९८५ पासून ते ॲटलांटात असल्यानं मराठी मंडळ स्थापण्यापासून ते वाढवत नेत २००५चे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन आयोजित करण्यात त्यांची आघाडीची भूमिका होती. इतरही भारतीय संघटनांना मदत करण्यास ते सदैव तत्पर असत. सुमारे २० वर्षे ते अन्नधान्य व्यापार क्षेत्रात कार्यरत होते. आयात-निर्यात विषयात त्यांचा दांडगा अनुभव होता. आमचे जॉर्जिया राज्य व भारत यांच्यात व्यापार वाढावा यासाठी स्थापलेल्या गटात ते खूप वर्षे कार्यरत होते. इथल्या भारतीय दूतावासाला त्यांची वेळोवेळी मदत होत असावी. मात्र याचा गवगवा करताना मी त्यांना कधीच पाहिलं नाही. तसे ते मिश्किलही होते! एका पार्टीत त्यांनी एक किस्सा सांगितला. "पूर्वी एक प्रसिद्ध भारतीय कलाकार कार्यक्रमासाठी आले तेव्हा त्या मंडळींना विरंगुळा मिळावा म्हणून इथली प्रेक्षणीय स्थळं दाखवायला घेऊन गेलो होतो. कोकाकोला सेंटरमध्ये प्रवेश करणार तेव्हा त्या कलाकाराचं लक्ष तिथे लागलेल्या विविध देशांच्या झेंड्यांकडे गेलं. त्यांनी मला सांगितलं, की इथे सगळ्या देशांचे झेंडे आहेत, फक्त भारताचाच नाही! मी आत जाणार नाही, परत घरी जाऊया."


याबद्दल राजन काका आम्हाला सांगतात कसे, "त्यांचा देशाभिमान मी समजू शकतो, पण ज्या देशानं 'कोक'ला हाकलून दिलं, त्याचा झेंडा कोकाकोला सेंटरमध्ये का लावतील? मी त्या कलाकारांना समजावत बसलो नाही, पण त्यांच्या तिकिटाचे माझे पैसे मात्र वाया गेले!" अतिशय सौम्य वृत्तीचा व मदतशील सद्‌गृहस्थ. मला वाटतं इथल्या मराठी व भारतीय समाजानं त्यांचा आधार व दूत आज गमावला आहे, आणि आम्ही आमचा जेष्ठ स्नेही!

एक विचित्र योग म्हणजे राजनकाकांची माझी शेवटची भेट झाली ती **डॉ. शशी गोरे** यांच्या श्रद्धांजली सभेत! डॉ गोरे यांचे वय आणि झालेला विकार पाहता "अतर्क्य ना झाले काही, जरी अकस्मात" असं म्हणता येईल, परंतु म्हणून आप्तेष्टांचं दुःख कमी होत नाही. मोघमपणे आम्ही त्यांना २५ वर्षं ओळखत होतो ('आयोवा'पासून), परंतु गेल्या १०-१२ वर्षांपासून ते जवळच राहायला आले आणि घरोबा वाढला. त्यांच्या घरातल्या अनेक उत्सवी प्रसंगी ते आम्हाला आवर्जून बोलवत. शिवाय आमच्या गप्पांमधून पुण्या-मुंबईच्या अनेक ओळखी निघाल्या. ही मंडळी त्यांच्या कॉलेज काळातले मित्र, त्यामुळे त्यांच्या गमतीजमती ती दोघं आम्हाला सांगत असत. प्रथम १९६३ पर्यंत भारत, मग आफ्रिका, पुढे ८०च्या दशकापासून अमेरिकेत वास्तव्य, पर्यटनासाठी केलेला देशांचा अफाट प्रवास यामुळे त्यांच्याबरोबर गप्पा मारणे हा मोठा आनंददायी अनुभव असे. त्यांना संगीताची उत्तम जाण होती. पूर्वी ते निरनिराळी वाद्यंही वाजवत असत त्यामुळे तोही आमच्या गप्पांचा विषय होई. आम्हा दोघांच्या गायन-वादनाचं त्यांना कौतुक होतं. खरं म्हणजे आमच्यात एका पिढीचं अंतर, परंतु शशी व सुधाताईंना भेटून आलो, की आमची बॅटरी चार्ज व्हायची! त्यांना स्वतःची महती सांगणे वर्ज्य, त्यामुळे त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातल्या मानाच्या पदव्या, विविध फेलोशिप्स व व्यवसायात त्यांनी समर्थपणे पेललेलं (फ्लॉरिडातल्या एका मोठ्या प्रभागातलं) 'चीफ कॉरोनर' हे जबाबदारीचं पद या सगळ्याबद्दल मला त्यांच्या श्रद्धांजली सभेतच जास्त कळलं. फ्लोरिडात कार्यरत असताना मुलांवर होणारे अत्याचार, किंवा मुलांचे पाण्यात बुडून होणारे अपघाती मृत्यू कसे कमी करता येतील यावर त्यांनी भरीव कार्य केलं. ४-५ वर्षांपूर्वी शशीकाका मला एकदा सांगत होते, "मी खूप भाग्यवान. मला आयुष्यात चांगल्या संधी मिळाल्या. मला माझं आयुष्य उत्तम पद्धतीनं जगता आलं. जमेल तेव्हा समाजाला छोटीशी परतफेड करण्याचा मी प्रयत्न करतो".



त्यांचे एक मित्र सांगत होते, "शशीला एका मुलाखतीत विचारलं गेलं, की माणसांचे मृतदेह हाताळून आपल्याला डिप्रेशन कसे येत नाही? त्याने त्या अमेरिकन पत्रकारास फार समर्पक उत्तर दिलं- मी गीता वाचतो व आत्मा अमर आहे ही माझी धारणा आहे. त्याने त्या देहाचा केव्हाच त्याग केलेला आहे. मी फक्त त्याची जीर्ण वस्त्र हाताळतो आहे". त्यांना संस्कृतबद्दल खूप आस्था होती, म्हणून त्यांनी पुण्याच्या भांडारकर संस्थेला कायमस्वरूपी 'रिसर्च फेलोशिप'साठी भरघोस देणगी दिली. कुतूहल व संशोधन हा त्यांचा स्थायीभाव होता. (एकदा कॉफी पिताना साखर की स्प्लेन्डा यावर आम्हाला त्यांनी पटकन अभ्यासपूर्ण माहिती दिली होती.) हा इहलोक सोडतानादेखील त्यांनी वैद्यकीय संशोधन संस्थेला देहदान केलं. एकंदरीतच आयुष्याचा अनुभव पूर्णपणे घ्यावा, येणाऱ्या उतार-चढावांना धीरोदात्तपणे सामोरं जावं, आणि इतरांना यथाशक्ती मदत करावी याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे शशिकाका. आता या वडीलधाऱ्या प्रसन्नमुख मित्रा"चे नसणे आम्हाला वेळोवेळी जाणवेल.

माझ्या लहानपणी पेपरातले पुण्यतिथीचे फोटो व त्या खालच्या ओळी माझं लक्ष वेधून घेत असत. "एकही दिवस असा गेला नाही, की तुमची आठवण आली नाही" किंवा तत्सम आशयाच्या. यंदा १६ मार्च २०२३ रोजी मला प्रकर्षाने जाणवले, की गेले वर्ष आम्ही त्या ओळी अक्षरशः जगतो आहोत, कारण गेल्या वर्षी याच दिवशी तर आमचा जिवलग मित्र **मिलिंद फडके** आम्हाला सोडून गेला.



चार महिन्यांपासून अशक्तपणा वगैरेमुळे डॉक्टरच्या भेटी, खऱ्या आजाराचं निदान होते, तोच अतिदक्षता विभाग, आणि तीन आठवड्यांत मृत्यू - हे सारंच अतर्क्य, अकस्मात व अकालीही; कारण ५६ वर्षे हे जाण्याचं वय नव्हे! असं कसं झालं व त्याच्याच बाबतीत का झालं याची चर्चा करण्यात आता अर्थ नाही.

वैद्यकीय व्यवस्थेतल्या काही त्रुटी किंवा नियती म्हणा, आमचा जिवाभावाचा मित्र मात्र आम्ही गमावला. खूप हुशार, अतिशय मनमिळावू आणि सरळमार्गी. मितभाषी स्वभावामुळे कंपनीतले कठीण प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात त्याची हातोटी असावी. त्याच्या शोकसभेत कंपनीतले सहकारी त्याचे वेगवेगळे किस्से सांगत होते. नातेवाईकांचा तर तो अगदी लाडका होता. त्याच्या आई खूपच धीराच्या; त्यांनी पाठवलेला संदेश कोणीतरी वाचला, तेव्हा मात्र उपस्थित सुमारे दोनशे लोकांचा बांध नकळत फुटला होता. आज एका वर्षानं त्या सगळ्या स्मृती आणि माझ्या आठवणी पुन्हा दाटून आल्या आहेत ...

२००७ मध्ये मुलांच्या प्राथमिक शाळेच्या 'Fall Festival'मध्ये त्याची पहिल्यादा भेट झाली. आम्ही नुकतेच अ‍ॅटलांटाला आलो होतो आणि मिलिंद, अमिता आमच्या आधी ४-५ वर्ष (कॅलिफोर्निया, लंडन, न्यू जर्सी येथे १०-१२ वर्ष राहून) दोघंही अगदी अगत्यशील व लाघवी शिवाय त्यात खाणे-खिलवणे, संगीत, प्रवास असे बरेच समान धागे. कधी काही पोचवायला घरी गेलो की, "अरे जातोस कुठे, आ जाओ यार" असा मोकळा ढाकळा नागपुरी आग्रह. त्यामुळे ओळख वाढायला आणि संबंध गाढ व्हायला फार काळ लागला नाही. मिलिंद-अमिता व दोन्ही मुलं 'आऊटडोअर अ‍ॅक्टिव्हिटीज्'साठी सदैव तयार असत- एकमेकांबरोबर गप्पा/चेष्टा मस्करी करत करत आम्ही कितीतरी ट्रेक केलेले आहेत. गेल्या ८-१० वर्षात आम्ही दोन्ही कुटुंबांनी केलेले अनेक प्रवास यातूनही मैत्रीची वीण घट्ट होत गेली. टेनिस-बास्केटबॉल हे त्याच्या खास आवडीचे त्यामुळे आमच्या मुलांशी तो त्यावर चर्चा करीत असे. मी त्याला म्हणे, मला आपले पदयात्रा व बैठे खेळच बरे! तो मात्र नेमानं टेनिसला जाई व 'टीम'नेही नियमित प्रॅक्टिस करावी हा आग्रह धरे. चारही मुलांच्या शाळा कॉलेज प्रवासात एकमेकांशी सल्लामसलत व पुढे त्यांचे कॉलेज-प्रवेश झाल्यावर 'हुश्श' वाटणे या साऱ्या गोष्टींत आम्हाला एकमेकांची साथ होती. आमच्या घरच्या समारंभांना व मुख्य म्हणजे अडीअडचणींच्या प्रसंगी मिलिंद-अमिता पटकन मदतीला हजर व्हायचे. बरेचदा शुक्रवारी रात्री एखादा चित्रपट किंवा नुसत्याच गप्पाटप्पा करायला एकमेकांकडे जाणं व्हायचं. आणि अगदी मोकळेपणे बोलणं व्हायचं, कारण खात्री होती, की nothing said leaves the room! त्याला नाटकं, चित्रपट, शास्त्रीय संगीताचं वेड होतं; अ‍ॅटलांटातल्या कितीतरी उत्तम कार्यक्रमांना आम्ही एकत्र गेलो आहोत. आणि परत येताना त्या कार्यक्रमाचं विश्लेषण. आता हे सारं कोणाबरोबर करायचं?

लता व मुकेश ही आमच्या दोघांचीही सिनेसंगीतातली दैवतं. आमच्या 'karaoke' ग्रुपमध्ये त्यांची (गंभीर धाटणीची!) गाणी आम्ही दोघं गाणार हे जणू इतरांनी गृहीत धरलेलं असे. मात्र कोणाचंही गाणं चांगलं झालं तर त्याची 'बढिया' ही मनापासून दिलेली दाद अजून कानात गुंजतेय. ६ फेब्रु २०२२ला लताबाई गेल्या... आम्हाला दोघांनाही मनापासून दुःख झालं होतं. मिलिंदच्या प्रकृतीच्या कुरबुरी सुरूच होत्या, पण त्यानं ठरवलं, की ग्रुपला बोलवायचं आणि सगळ्यांनी लताबाईंना गाण्याद्वारे श्रद्धांजली द्यायची! कार्यक्रमाचं शेवटचं गाणं त्यानं अगदी खास निवडलं होतं. म्हणाला, "I know it is a duet, पण मी एकटाच गाणार आहे" आणि खूप मनापासून गायला. ते गाणं होतं, **'रहे ना रहे हम, महका करेंगे'...** आणि दैवदुर्विलास बघा, बरोब्बर एका महिन्याने तोच आम्हाला सोडून गेला. आता इतकंच म्हणणं नियतीनं आमच्या हाती ठेवलं, "**तुम ना जाने किस जहाँ में खो गये" ...**

***

# भटके पक्षी



भटके पक्षी थव्याथव्यानी येऊन बसतात.
त्यांच्या उडण्याच्या प्रत्येक कडव्याला देशांतराचे धृवपद असते... अशी एक कविता आहे; ती मला आठवते कुठल्याही हटके ठिकाणी! त्या भटक्या आणि 'हटके' आठवणींची काही शब्दांकने... तिथे भेटलेल्या माणसांसकट आणि संस्मरणांसकट! - विद्या हर्डीकर सप्रे

## 'रिश्ते कभी पुराने नहीं होते'

**- विद्या हर्डीकर सप्रे** (मरिएटा, कॅलिफोर्निया)



गेल्या महिन्यातली एक दुपार! सॅन फ्रान्सिस्को विमानतळ पहाण्याचा माझा पहिलाच प्रसंग! कारण गेल्या ३० वर्षात मी फक्त तीन वेळा विमानाने बे एरियात प्रवास केला आहे. लॉस अँजेलिसहून बे एरियात जाताना गाडी घ्यायची आणि निघायचं चार चाकांवर, हे माझ्यासाठी जास्त सोयीचं असतं. हा विमानतळ हे काही फार प्रेक्षणीय स्थळ नसलं तरी तिथून लाल लाईन बार्ट (बे एरिया ट्रान्सिट ऑथॉरिटी) सुटते आणि थेट बर्कलेला येते हे मुख्य आकर्षण होतं.

प्रवासाला निघण्याच्या आदल्या दिवशी एकदम लक्षात आलं की, "अगोबाई, आपण वयाचा पुरावा दाखवला तर ज्येष्ठ नागरिक म्हणून स्वतःला सिद्ध करू शकतो. आणि 'बार्ट' ची काही सवलत असेल तर ती मिळवू शकतो की !" . मग ती शोधाशोध आणि फोन करून सवलतीचं कार्ड मिळवण्याचा बेत केला. आता ते विमानतळावर द्यावं की नाही ? पण मग असं सामान्य माणसाचं तर्कशास्त्र वापरेल ते सरकार कसलं? त्यामुळे बार्ट, हातातला सामानाचा लळालोंबा आणि स्वतःचा अवतार सांभाळत वाटेत 'एम्बॅर्कडेरो' नावाच्या काहीतरी ठेसनावर उतरून तो सिनियर विक्लिपर कार्ड प्रकार केला. पुन्हा पुढल्या बार्ट मध्ये चढले. त्यात कानातलं हरवताना वाचलं पण पिशवीत पाणी सांडलं. यापुढे पाणी-बाटली किंवा पिशवीतील कागद एक काहीतरी प्लास्टिक आवरणात ठेवणे हा पहिला धडा.

बर्कलेला उतरून भाऊंच्या धक्क्यावर आलेल्या-सारखा चेहेरा करून इकडे तिकडे पहात असताना आकाशने -माझ्या बर्कलेतल्या अतिथी संयोजकाने- मला शोधलं आणि मग उबर या सुलभ मार्गाने, बर्कले परिसर पहात वाटेतली उपहारगृहे हेरून ठेवत आम्ही त्याच्या घरी आलो. आता जरा चिल व्हा, उद्या बघू कामाचं", ही आज्ञा मानून मग मी निवांत घर पाहिलं. दिशा समजावून घेतल्या, चिवड्यावर ताव मारला; मग घरामागच्या अंगणात! अंगण कसलं, ही तर वनराई, विपश्यनेला योग्य जागा. इथे हरणं दिसतात, पक्षी दिसतात. मागे फुललेला एक वृक्ष दिसतो... त्याच्या फांद्यामधून दिसणारा गोल्डन गेटचा पूल आणि ती सॅन फ्रान्सिस्कोची क्षितिजरेखा ! पाण्याची चमचम आणि दिव्यांच्या झगमगीची चाहूल.

हे घर उतरणीवर, दीडशे वर्षाचं जुनं आणि जून! वठलेलया वृक्षासारखं. घराला अंगणात डोकावणारी एक बाल्कनी. वरचे दोन मजले मालकांचे व तळघराचा भाग आकाशला भाड्यानं मिळालेला, तिथे त्याचं 'मिनिमलिस्टिक जग'. बाहेरच्या खोलीत त्याच्या संशोधनासाठी सहज हाताला लागावी म्हणून ठेवलेली चार पुस्तकं, टेबल त्यावर एक संगणक! यात त्याच्या येऊ घातलेल्या शोधनिबंधांची तयारी व फोनमध्ये सामावलेलं वेळापत्रकाच जग. पाहुणे आलेच तर तिथे त्यांच्यासाठी 'सोफा-बेड'ची व्यवस्था. बाहेरचं थंड झालं, की घर थंड पडतं, म्हणून कडेला एक हवा गरम करणारं यंत्र म्हणजे रूम हीटर. बाजूला स्वयंपाकघर व एक झोपायची खोली. आपल्याला घरात इतका पसारा का लागतो, असा विचार करत मी जेवणाच्या टेबलावर माझ्या कामाचा पसारा घातला.

मग सूर्यास्त पहायला आम्ही 'इंडियन रॉक पार्क ' या जवळच्या ठिकाणी थंडी म्हणून 'चिल चिल' चालत गेलो. वाटेत दोन तीन ठिकाणी डॅफोडिल्स उगवलेली, ट्युलिप उगवायला घातलेली, आणि काही चेरी ब्लॉसम. साकुरा! चढउतारानं माझ्या वेगाला चाप लागला, पण रॉकवर चढून तिथला सूर्यास्त पहाणे हा मनोहारी अनुभव होता. समोर 'हा सूर्य आणि हा गोल्डन गेट ब्रिज' असं दृश्य आणि सॅन फ्रान्सिस्कोची स्काय लाईन क्षितिजरेखा. तोच रोजचा सूर्यास्त पहायला आणखी पुष्कळ लोक जमलेले... सूर्यास्त रोजचा असला तरी नित्य नवा असतो... असा रोज सूर्यास्त पहायचा आणि असं चालत जाऊन वजन कमी होतं का पहायचं, हे मी तिथल्या तिथे ठरवून टाकलं. (फक्त वाटेत पाहिलेल्या 'यू डेसर्ट' या ठिकाणी जाऊन तिथलं काय नवलपरीचं गोडधोड खायचं एकदा!) जाता येता दिसत होती ती तिथली घरं... काही जुनी, काही नवी... प्रत्येक घराला स्वतःचं व्यक्तिमत्व. परिसर निवांत. इथून वीस-पंचवीस मिनिटे चाललं, की बर्कलेची गजबज सुरू होते यावर विश्वास बसू नये असं वेगळंच विश्व.

विद्यापीठाचा परिसर प्रथम पाहिला माझ्या विद्यार्थी-अवस्थेत, तेथील विद्यार्थी नव्हे तर प्रेक्षणीय स्थळ पहाणारी प्रवासी म्हणून. "हेच ते विद्यापीठ, जिथे प्रत्येक नवी चळवळ सुरू झाली"... ते अर्धचंद्राकृती हिरवळीचे प्रवेशद्वार, बुटक्या बोटांचा हात दिसावा तसे ते ओळीने लावलेले कसलेसे वृक्ष, तो मनोरा; मग एकेक विभागाच्या इमारती... तेव्हा ते सगळंच मी आ वासून पाहिलेलं. इथे नोबेल मिळवलेले प्राध्यापक व संशोधक असतात. त्यातील एखादा समोर आला तर कसा ओळखायचा? तिथे आठवण म्हणून काढलेला माझा फोटो आलाच नाही. मग इथे प्रवेशाचा विचार तर दूरच! बर्कले म्हणजे फक्त विद्यापीठ अशी-

समजून करून घेतल्यामुळे असेल, पण तेव्हाचा परिसराशी व गावाशी दुरावा तो दुरावाच राहिला.


नंतरची अवस्था होती मुलीला बर्कलेमध्ये प्रवेश मिळाला ती. या मुलांचे केवढे ते सामान, संगीताच्या कॅस्सेट्स, कपडे आणि काय काय... सामान डॉर्ममध्ये पोहोचवता पोहोचवता पाठी मोडून जायची वेळ. मग ती डॉर्म, त्या पिटुकल्या खोल्या ते कॉमन शॉवर्स. रस्त्यावरून चालणारे केसांच्या जटावाले ते 'होमलेस' लोक. पण आमच्या सात परांच्या गाद्यागिर्द्यांवर लोळणाऱ्या मुलामुलींना त्याचं फारसं काही नव्हतंच. त्यांना होती नव्या स्वतंत्र आयुष्याची झिंग! पालक म्हणजे फी भरणारे, क्रेडिट कार्ड्सची बिलं भरणारे आणि सामानाचं ओझं वहाणारे कोणीतरी. दर उन्हाळ्यात सगळे सामान पुन्हा गाडीत भरून घरी नाहीतर कुठेतरी ठेवायला न्यायचे. डॉर्मचे वर्ष संपून अपार्टमेंट घेतले तरी तेच. त्या खोल्या, ते पसारे आणि ती सिंकमध्ये पडलेली भांडी. घरातून नेलेले मिसळण्याचे डब्बे तीन वेळा गायब झाले. बाकी भांडी तर आत गेली की आपली नव्हेतच.

पुढली चार वर्षे मी काहीतरी ने आण करायला, नाहीतर खाऊ पोहोचवायला सहा-सात तास ड्राईव्ह करून येत होते. आईचं हृदय, मुलीच्या काळजीचं ओझं, असे खांदे वाकलेली ती मी! जवळ जवळ महिन्यातून एक खेप होत असे. शुक्रवारपर्यंत स्वतःच्या आणि नोकरीच्या संसाराची ओझी वहायची. शनिवारी भल्या सकाळी निघून बर्कलेला यायचं. ग्रोसरी भरून द्यायची. अपार्टमेंट स्वच्छ करायचा प्रयत्न करायचा. त्यातल्या रणधुमाळीत जमलं तर चार पदार्थ करून फ्रीज भरून ठेवायचा आणि बर्कलेतून बाहेर पडायचं. निवांत भटकण्याचा विचार करण्यापूर्वीच वेळ व शक्ती संपून जायची. घरी जाताना मात्र वाटेत सॅन होजेला चारुकडे जाण्याची ओढ असे. तिथे खांद्यावरचं ओझं थोडा वेळ उतरवायचं. मैत्रिणीच्या सुखदुःखाच्या गप्पा मारायच्या. निवांत रहायचं. रविवारी सकाळी निघून लॉस अँजेलिसला घरी परत! कधी मुलांच्या सोशल गॅदरिंग निमित्तानं मुलींना कोळीणीचे मेक अप करायला, साड्या नेसवायला एक खेप मारायची, त्यांचे कार्यक्रम कौतुकाने पहायचे, त्यांना भारतीय उपहारगृहात नाहीतर थाय फूड खायला न्यायचं.

पण इतक्या वेळा जाऊनही त्या चार वर्षात बर्कलेचं व माझं सूत कधी जुळलं नाही. शेवटी एकदाचा तो पदवीदान समारंभ झाला. मुलांचे गोंगाट, टोप्या नि गाऊन्स ती भाषणे आणि फोटो... माझ्या आणखी मराठी मैत्रिणीची मुले त्याच पदवीला होती. त्यामुळे मग आमचे पालकांचे सुटकेचे निश्वास आम्ही एकत्रच टाकले आणि 'पसंद' मधला डोसा खाऊन आपली मुलं पदवीधर झाल्याचे आनंद साजरे केले.

त्यानंतरची अवस्था म्हणजे आलेल्या पाहुण्यांना सॅन फ्रान्सिस्को, गोल्डन गेट दाखवताना केलेली बर्कलेची चक्कर जमल्यास इथेच कोण्यातरी भारतीय उपहारगृहात जेवण व्हायचे. पण विद्यापीठ परिसराबाहेर येऊन बर्कले गावात फारसे हिंडणे नाहीच झाले. पुन्हा ती बर्कले दूरस्थच. त्या बुटक्या हाताच्या खोडांच्या वृक्षांची ओळख मात्र जुनी. मनोऱ्याजवळ काढलेले फोटो दर वेळी नवे. हे सर्व करताना जाण्यायेण्याच्या वाटेवर बे एरियातले मित्र भेटायचे आणि बंध पुन्हा दृढ व्हायचे. त्यामुळेच की काय; तीस वर्षे दक्षिण कॅलिफोर्नियामध्ये राहूनही मला बे एरिया बद्दल आत्मीयता वाटते आणि इथली वैचारिक आणि सांस्कृतिक समृद्धता मला पुन्हा पुन्हा इथे ओढून आणते.

यंदाची ही चौथी अवस्था बर्कलेच्या संशोधक विद्यार्थ्याचे पंधरा दिवसाचे आतिथ्य स्वीकारून 'चिल' होण्याची. आता मला बर्कलेत प्रवेश घेण्याची इच्छा उरली नाही, की नोबेल लारिएट दिसण्याची अपूर्वाई नाही. आमची मुलगी बर्कलेत जाते, अशी शेखी मिरवण्याचे दिवस निघून गेलेले. कुठलीही ओझी खांद्यावर नाहीत. कुठलेच पाश उरले नाहीत. आता काहीशी निःसंग, बरीचशी स्वच्छंद अवस्था अशा मनाने मी माझ्यातलं नव्या नवलाईचं कुतूहल डोळ्यात साठवत होते. बर्कले स्वच्छ झाल्यासारखं वाटलं! डाउन टाउन मध्ये काही नव्या चकचकीत इमारती दिसत होत्या. विद्यापीठापुढची तीच अर्धचन्द्राकृती हिरवळ, तेच प्रवेशद्वार. तिथे अर्धगोलात बसून वीडचे झुरके मारणारे तरुणाईचे अड्डे. कसल्या ना कसल्या चळवळीची पोस्टर्स, परिसरात भरलेले मॅग्नोलियाचे डौलदार कळे. नव्यानं पुन्हा येणाऱ्या वसंताची



हूल देणारे. बर्कलेच्या परिसरात इतके सुंदर मॅग्नोलिया आहेत हे कसं कधीच माझ्या लक्षात आलं नाही?

प्रथम बर्कले पाहिली तेव्हाचा तोच पहिला "awe" आत्ताही माझ्या डोळ्यात! तेच भारावणं आणि त्यात आता नव्याने कळलेली झिंग! वीड न घेताच आपण "High on life" असल्याचं भान! रोज परिसरातून निवांत चालत घराकडे येताना एक बर्कले नावाचं गाव रूप, रस गंधासह समोर येत होतं. मग मला नव्याने दिसू लागला तो सूर्यास्त, गोल्डन गेट, ते चढउताराचे रस्ते, कोपऱ्यावरचे कारंजे, त्याजवळची बेकरी, ती गोड हसून टाटा करणारी टुमदार घरं! रस्त्यातून भटकताना ते 'यु डेसर्ट' नावाचं दुकान दिसलं आणि माझ्या आतिथ्यशाली मित्राबरोबर आत जाऊन आम्ही नव्या नवलाईचं 'डेसर्ट' मागवलं. त्याचे फोटो काढून 'व्हॉट्स ॲप स्टेटस'वर टाकले. मग पळत पळत जाऊन बस पकडली. सगळं एकदम बर्कले शैलीचं, पण नव्या नवलाईचं.

तेव्हा या गावाशी आणि या विद्यापीठाशी गेल्या चाळीस वर्षात न फुललेलं माझं नातं मॅग्नोलियाच्या डौलदार कळीसारखं मनात उमलू लागलं. कुणीतरी कवितेत म्हटलं आहे ना, **"रिश्ते कभी पुराने नहीं होते"**.

***

# अष्टपैलू कलाकार: मेधा अत्रे-कुलकर्णी

**- विनता कुलकर्णी** (शिकागो)

न्यू जर्सी येथे स्थायिक **मेधा अत्रे कुलकर्णी** ही मुंबईच्या 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स' संस्थेची



विद्यार्थिनी. तेथून बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स पदवी शिक्षण घेऊन गेली २०+वर्षे कलाक्षेत्रात कार्यरत मेधा अनेक पुरस्कारांनी सन्मानित "प्रॉप"* डिझायनर आणि अष्टपैलू कलाकार आहे. तिचा असा विश्वास आहे, की कला ही जीवनाची एक पध्दत असून ती भिंतीवरील केवळ पेंटिंग पुरती मर्यादित नाही.

मेधाने अलीकडेच मिसेस युनिव्हर्स नॉर्थ ईस्ट अमेरिका, **डॉ. (डेंटिस्ट) जान्हवी राणे** यांच्यासाठी एक मोठे 'प्रॉप डिझाइन' तयार केले. फेब्रुवारी २०२३ मधे सोफिया, बल्गेरिया येथे झालेल्या **'४५व्या मिसेस युनिव्हर्स पॅजंट'**मधे राष्ट्रीय फेरीत सहभागी जान्हवीने रंगमंचावर हे प्रॉप अतिशय प्रभाविपणे सादर केले. (Watch:-

**https://www.youtube.com/watch?v=F1h-l9TwT8U**)

मेधाने यापूर्वीही अनेक कार्यक्रमांसाठी वैविध्यपूर्ण मोठे प्रॉप्स तयार केले आहेत. तिच्या मते प्रत्येक प्रॉपला वेगळे आव्हान असते, ग्राहकाच्या गरजा वेगळ्या असतात. म्हणून प्रत्येक प्रॉपचा प्रकल्प त्यासाठी वापरलेले साहित्य, साधने व कौशल्ये या दृष्टीने अद्वितीय असतो. जान्हवी राणे यांच्यासाठी प्रॉप बनवताना एक अनोखे आव्हान होते. या प्रॉपचे ६ फूट x ८ फूट असे आकारमान असूनही ते न्यू जर्सी ते बल्गेरीया हवाई प्रवासासाठी अनेक लहान तुकड्यांमध्ये "पोर्टेबल" आणि "पॅक" करण्यायोग्य बनवणे आवश्यक होते. कार्यक्रमापूर्वी प्रॉपचे हे सर्व तुकडे योग्य रीतीने एकत्र जोडण्यासाठी रंगमंचामागे सुलभ प्रणाली (बॅकस्टेज असेंब्ली सिस्टीम) आवश्यक होती. संपूर्ण जग 'मिसेस युनिव्हर्स पॅजंट' कार्यक्रमाचा हा सोहळा पाहत असताना, मिसेस युनिव्हर्स २०२३च्या आंतरराष्ट्रीय शो रॅम्पवर डौलदारपणे पण सहजपणे चालत जाण्यासाठी हा प्रॉप बळकट, परंतु वजनाने हलका असणे गरजेचे होते. अतिशय चिकाटीने व काळजीपूर्वक काम करून सर्व बाबींची पूर्तता करून मेधाने जान्हवी राणेंसाठी आकर्षक व कलात्मक प्रॉप बनवला.

मेधाने भारतात प्रॉप डिझायनर आणि झी टीव्हीवर प्रसारित होणाऱ्या (१९९०चे दशक) साप्ताहिक 'गेम शो- "एडी मॅड शो"साठी ॲनिमेटर म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. तिने भारतातील अनेक नामांकित ॲनिमेशन स्टुडिओसाठी तसेच युनिसेफ आशिया आणि आफ्रिका, सिंगापूर टीव्ही 10, पिल्सबरी व केलॉगच्या जाहिरातींसाठी ॲनिमेटेड चित्रपट, दूरदर्शन-मालिका आणि जाहिरातींसाठी काम केले आहे.

अमेरिकेत आल्यावर स्वतंत्रपणे कलाशिक्षिका आणि फ्रीलान्स कलाकार म्हणून मेधाचा कलाप्रवास सुरू झाला. ॲक्रेलिक, वॉटर कलर्स, ऑइल, पेन्सिल, चारकोल आणि डिजिटल आर्ट अशा मानक पारंपरिक कला-माध्यमांतून ती सादरीकरण करते. मेधाची कला न्यू यॉर्क येथील 'इंडियन कॉन्सुलेट', 'लॅनिंग ॲव्हेन्यू स्कूल लायब्ररी' आणि विविध कलासंग्रहात समाविष्ट आहे. तिने आजवर अनेक चित्रकला-प्रदर्शनात पुरस्कार मिळवले आहेत.

मेधा अत्रे-कुलकर्णी हिचे अभिनंदन आणि तिला कलाक्षेत्रातील तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा! तिच्या कला-उपक्रमांविषयी अधिक माहिती:-


**https://medha-atrekulkarni.pixels.com/**

(* टीप: Prop - रंगमंच किंवा पडद्यावरील कलानिर्मितीसाठी तयार केलेले देखावे, वस्तू, इत्यादी.)

***

# पुस्तक-परिचय

- **प्रियदर्शन मनोहर** (पिट्स्बर्ग,पेन्सिल्वेनिया)




सुप्रसिद्ध अमेरिकन मराठी लेखिका **डॉ. ललिता गंडभीर ह्यांचं "Featured Creatures: Animals in Our Lives"** हे इंग्रजी भाषेत लिहिलेलं पुस्तक नुकतंच वाचून संपवलं. पुस्तक खूपच सुरेख, चित्तवेधक झालं आहे. गंडभीर ह्यांच्या घरातलं प्राण्यांचं वैविध्य वाचून थक्क व्हायला झालं! नेहमीची कुत्री, मांजरं तर त्यात आहेतच; पण त्याबरोबरीने मासे, साप, गांधीलमाशा, खार, कोळी, हॅमस्टर (घुशीसारखा प्राणी) इत्यादी अनेक प्राणी माणसांबरोबर खेळीमेळीने (बहुतेक वेळा) राहतात! वास्तविक मी कोकणातच वाढलो. त्यामुळे प्राण्यांच्या संगतीतच वाढलो आहे. पण पावसाळ्यातले मृगकिडे काड्यांच्या पेट्यांत ठेवण्यापलीकडे आम्हाला वैयक्तिक "पेट्स" पाळायला परवानगी नव्हती. भारतात हल्ली पेट्स घरी आणण्याची पद्धत वाढते आहे. कदाचित आता कुटुंबात शक्यतो एकेकच मूल असल्याने पेट्सची गरज वाढू लागली असेल.

डॉ. गंडभीर यांच्या पुस्तकातल्या 'मुनी' लून (बदकासारख्या दिसणाऱ्या ह्या पक्षाचं नाव पूर्वी मी ऐकलं नव्हतं!), बबून माकडं, वटवाघूळ, बिग रेड कुत्रा, भिक्या मांजर वगैरे प्राण्यांच्या कथा हृद्य आहेत. मुलीच्या बेडरूममधलं सापाचं अस्तित्व वाचून मलाही प्रचंड धक्काच बसला! पुस्तक गतिमान असल्यामुळे वाचताना कुठेही रेंगाळत नाही. अलास्कापासून आफ्रिकेपर्यंतच्या अनेकविध प्राण्यांची वर्णनं वाचताना मजा येते. डॉ. गंडभीर ह्यांची प्राणिजगताची निरीक्षणं (पान क्रमांक १०४) फार सखोल आहेत. प्राण्यांचं अंतरंग त्या किती कुशलतेने जाणतात, ह्याची प्रचिती येते. प्राण्यांची स्वभाववैशिष्ट्ये, स्पर्धा, ईर्षा, मत्सर आणि त्यांचा नैसर्गिक चांगुलपणा, उदारता ह्यांचं अतिशय नेमकं वर्णन पुस्तकात आहे.

ह्या पुस्तकात प्राण्यांच्या वर्णनाबरोबरच त्यांची रंगीत छायाचित्रंसुद्धा जोडलेली आहेत. प्राण्यांची नावंही- चिको खार, मुनी बदक, 'वाल्या' कोळी! अँजेल आणि शॅडो मांजर बिग रेड आणि हेत्री कुत्रे, ब्राउनी हॅमस्टर अशी कितीतरी मस्त मस्त नावं आहेत! त्या प्राण्यांना ती नावं कळली असती, तर त्यांनाही ती आवडली असती!

ह्या पुस्तकाची जाहिरात वाचून मला आधी असं वाटलं होतं, की हे लहान मुलांचं पुस्तक असावं. पण हे मोठ्या माणसांनी वाचण्याचं पुस्तक आहे. ह्याच माहितीवर आधारित, ज्यात छान मोठी मोठी चित्रं असतील, आणि छोट्या छोट्या वाक्यांमधून प्राणी जगतातली नाती व नाट्य रंगवलेलं असेल, असं एक छानसं 'चिल्ड्रेन्स बुक'देखील त्यांनी काढावं, असं मी डॉ. ललिता गंडभीर यांना सुचवेन.

प्राणी हातानी पकडणाऱ्या श्री. शरदरावांचे खास कौतुक! त्यांच्या तिन्ही मुलांच्या प्राण्यांची आवड जोपासायची परवानगी व उत्तेजन दिल्याबद्दल उभयतांचे मनापासून अभिनंदन! आपल्या भारतीय लोकांमध्ये हा गुण विरळाच आहे! इतकं छान पुस्तक लिहिल्याबद्दल डॉ. ललिता गंडभीर ह्यांचे हार्दिक अभिनंदन!

हे पुस्तक खरेदी करण्यासाठी अमॅझॉनवर उपलब्ध आहे. ( https://www.amazon.com/dp/1733835792 )

***

## बृहन्महाराष्ट्र वृत्त- ऑनलाईन विभाग

**पुरवणी विभाग:- (पृष्ठ क्र. १४ )**
- कविता:- **भारतकन्या जेव्हां होते अमेरिकेतील सून!**
- कविता:- **जागतिक वसुंधरा दिनानिमित्त- 'भूमी'**
- व्हिडीओ:-**साहित्य कुंज २०२३, मराठी विश्व न्यू जर्सी**

**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

**राशिभविष्य:- एप्रिल २०२३-** दादा दामले (न्यू जर्सी)

**https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

## वेळेची झाली भूल आणि स्वतःच झाला फूल

**चित्र-विनीता वेल्हाळ** (डब्लिन, कॅलिफोर्निया), **कल्पना - गौतम पंगू** (फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया)






## मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा अद्‌भुत नवा खेळ

आवाहन:- कोणत्याही भाषेत अशी रचना करणे शक्य आहे का, की त्या रचनेमधील शब्दांची फोड केल्याने नवीन अर्थपूर्ण आशय निर्माण होऊ शकेल? मराठी भाषेत हा प्रयोग गंमतीचा व सहजसाध्य असावा या अंदाजाने हा खटाटोप! अशी रचना म्हणीसारखी संक्षिप्त, विशेष अर्थपूर्ण किंवा गहन विचारप्रवर्तक असल्यास अधिक छान!




**- कांचन गोडबोले** (क्लीव्हलँड, ओहायो)
दुकानदार ग्राहकास:
**"पलंग, उशी, चादर मिळून १०,००० रुपये होतात."**
(शब्दफोड)
**"पलंग, उशीचा दर मिळून १०,००० रुपये होतात."**

***

**- विनता कुलकर्णी** (शिकागो, इलिनॉय)
(वृत्त चाल पादाकुलक:)
**नभास असतो, श्वास आपुला**
**त्याविण जीवन, असे भूतलां?**
(वरील पंक्तींत श्वास/हवा/जलबाष्प; जीवन/पर्जन्यजल याअर्थी)
(शब्दफोड)
**न भास असतो श्वास आपुला**
**त्याविण जीव न असे भूतलां!**

टीप:- "शब्दफोड" खेळात भाग घेण्यांस इच्छुकांनी आपली रचना arvind.narale@sympatico.ca आणि vinata@gmail.com, या ईमेल पत्त्यांवर महिन्याच्या २० तारखेपर्यंत, आपले नांव, गांव यांच्या उल्लेखासह पाठवावी. त्यातील अर्थपूर्ण व उत्तेजनार्थ रचना बृ. म. वृत्ताच्या पुढील अंकात प्रकाशित करण्यात येतील.

- या सदरातील चित्रे अरविंद नारळे यांची निर्मिती आहे.

**- अरविंद नारळे** (टोरांटो, कॅनडा)
(वृत्त चाल शिखरिणी: (-+++++,- - - - - +, + - - - +)
**वनश्री दे हाका, अरसि कमला- " ए! प्रिय फुला..., ए! प्रिल फुला...!"**
(रसहीन कमलपुष्पाला वनलक्ष्मी, ' ए! प्रिय फुला, एप्रिल फुला !' अशा रीतीने हाका मारते.)
(शब्दफोड)
**वनश्री दे हाका, अरसिक मला- " ए! प्रिय फुला, ... ए! प्रिल फुला... !"**
(सौंदयाची जाण नसणाऱ्या मला, वनलक्ष्मी, ' ए! प्रिय फुला, एप्रिल फुला !' अशा रीतीने हाका मारते.)

***

## Supriya Kelkar honored by Michigan Congress on the House Floor



**Supriya Kelkar (**Daughter of Subhash and Preeti Kelkar), an award-winning author of many books, an illustrator and a screenwriter has been honored recently by Michigan's Congress on the House floor for her contributions to children's literature! Supriya grew up in the Michigan area, where she learned Hindi as a child by watching Hindi movies.She has worked on the writing teams for several Hindi films and one Hollywood feature.

Her published books are- 'Ahimsa' (Tu Books/Lee & Low Books, 2017), 'The Many Colors of Harpreet Singh' (Sterling, 2019), 'American as a Paneer Pie' (Aladdin/Simon &Schuster, 2020), 'Strong as Fire, Fierce as Flame' (Tu Books, 2020), Bindu's Bindis (Sterling, 2021), 'That Thing About Bollywood' (Simon & Schuster BFYR, 2021), 'Brown is Beautiful' (FSG, 2022, art by Noor Sofi), 'My Name' (FSG, 2023) and 'The Cobra's Song' (Simon & Schuster, 2023). For more details about Supriya's Creative work, visit:- https://supriyakelkar.com/

## NAMASKAR 🙏

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address:**

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**



**नाते जुळते मनाशी मनाचे**




## Reshimgathee

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level “Marathi Language Learning”
progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth’s
joint certificates for
“Marathi  Bhasha” examinations
after successful completion of
each level and  passing  criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- shala@bmmonline.org
https://bmmshala.net/

# बृहन्महाराष्ट्र वृत्त - पुरवणी

## एप्रिल, २०२३

**- (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)-**

**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

## भारतकन्या जेव्हां होते अमेरिकेतील सून!

- सौ. अनिला रगाडे (लुईविल, केंटकी)



भारतकन्या जेव्हां होते अमेरिकेतील सून |
नववर्षाचा घेते, लुटते, हर्ष आवर्जून ||

एक नव्हे, दोन नव्हे, तीन करते साजरे !
नववर्षोत्सव तीन सजवते एका संवत्सरें ||

वसंत ऋतु फुलवितो जेव्हां आसमंत सारा |
थाट मांडते गुढी उभारून, गुढीपाडव्याचा ||

भल्या पहाटें रंगांत येउनि उठविते ती सख्याला
गोड हासुनी खाऊं घालते कडुनिंबाचा मेवा ||

हास्य रोखुनी म्हणते त्याला "ऊठ पतिदेवा
आज आहे गुढीपाडवा, नीट बोल गाढवा!" ||

शरद ऋतूच्या अमावास्येला उजळूनहि टाकते
कंदील टांगून, पणत्या लावून, फराळहि करते!

फटाक्यांच्या धूमधडाक्यांत करते लक्ष्मी पूजन
सुरू करते ती नूतनवर्ष नेसूनी नवीन वसन ||

वर्ष संपते, धावतो महिना एकतीस कडे
शांपेन हातिं घेउनी ललना, "हॅप्पी-न्यू-ईयर" म्हणते!!

अशी आमुचि भारतकन्या जपते सारे संस्कार
"वसुधैव कुटुंबकम्" वेदोक्त सूक्त ती करते हो साकार ||

***

## भूमी

- प्रिया गोडबोले ( एडिसन, न्यू जर्सी)



### जागतिक वसुंधरा दिनानिमित्त
भूमी

एक चंद्र एक सूर्य एक ही धरा
अखंड लोटली युगे तरी ही स्थिर सदा

अनेक लेकरे तिची साधना
स्नेहातुर बाहू हृदयात अमृता

प्रतिक्षला संहार नाश नित्य दुष्ट दुर्दशा
आक्रमण अनेक क्लेश झेली एकला

ना बोलणे अधिक तिचे ना मागणेहि काही
मुक्त हस्त उधळुनी निसर्गदत्त समृद्धी

सदैव ध्यास वृद्धीचा ज्ञान प्रथम सर्वदा
स्वास्थ्य स्वस्थ चेतना निकोप ही मनस्विता

पराजया बघे निडर जयाचे स्वागत अपार
दिसो विषण्ण दिन तरी हरित अंकुरे बहार

पूजनीय वंदनीय उदात्त मनोकामना
अवर्णनीय अतुलनीय अद्वितीय भावना

कुणी म्हणा मातृ कुणी अवनी धरा धरणी
मातृभूमी मात म्हणा कुणी जन्मभूमी

***

## 'मराठी विश्व न्यू जर्सी' - साहित्य कुंज -२०२३

**कार्यक्रमाची यूट्यूब-लिंक:-**

**https://www.youtube.com/live/8ejmwMKE-j4?feature=share**